# नाशिक महानगरपालिका,नाशिक

## नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील उद्यान व वृक्ष प्राधिकरण/तरणतलाव/नाटयगृह विभागाकडील रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता कर्मचारी निवड समितीची बैठक.

## -: बैठकीचे इतिवृत्त :-

==========================================================================

नाशिक महानगरपालिका आस्थापनेवरील उद्यान/जलतरणतलाव व नाटयगृह विभागाकडील विविध संवर्गातील रिक्त पदे तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात पदोन्नतीने भरणेकरिता दि.४/१२/२०१२ रोजी नाशिक महानगरपालिका कर्मचारी निवड समितीची बैठक मा.आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात संपन्न झाली. सदर बैठकीस खालिलप्रमाणे अधिकारी तथा समिती सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.आयुक्त सो. | :- | अध्यक्ष |
| २) उपआयुक्त (प्र.) | :- | सदस्य |
| ३) अधिक्षक अभियंता (भु.ग.यो) | :- | सदस्य |
| ४) मुख्यलेखापरीक्षक | :- | सदस्य |
| ५) क्रिडा अधिकारी तथा मागासवर्गीय अधिकारी | :- | सदस्य |
| ६) कामगार कल्याण अधिकारी | :- | पदसिध्द सचिव |

सदर बैठकीसाठी कोरम पुर्ण झाल्याने दुपारी ०४ : ०० वाजता कर्मचारी निवड समितीचे कामकाजास सुरवात झाली. बैठकीत खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा झाली. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरतांना खालीलप्रमाणे सर्वसाधारण नियमावलीचा अवलंब करण्याबाबत समिती सदस्यांमध्ये सहमती झाली.

१) नाशिक महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केलेल्या नविन सेवाप्रवेश नियमांना अद्याप मा.शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने व वर्ग १ व २ ची अनुशेष बिंदु नामावली/रोष्टर रजिष्टर अद्याप शासनाकडुन प्रमाणित करुन मिळालेली नसल्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळयाचे कामे तत्परतेने करणेसाठी महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील सर्व संवर्गातील रिक्त पदे १००% पदोन्नती या तत्वावर तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात भरणेस मा.महासभा ठराव क्रमांक ३२७ दिनांक १८/१०/२०१२ अन्वये शिफारस करण्यात आलेली आहे त्यानुसार रिक्त पदांवर पात्र कर्मचाऱ्यांना १००% पदोन्नती तदर्थ (Ad-hoc) स्वरुपात देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली.

२) महानगरपालिकेच्या प्रचलित सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेली अनुभवाची अट ऐवजी शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, सामान्य प्रशासन विभाग दि.२५ ऑगस्ट १९८८ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००५/प्र.क.१/२००५/१२,सामान्य प्रशासन विभाग दि.२५ फेब्रुवारी २००५ मधील तरतुदीनुसार निम्न पदावर ३ वर्षांच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पुर्व अट म्हणुन विहीत करण्यास समितीने शिफारस केली.

३) पदोन्नतीकरिता विहीत शैक्षणिक अर्हतेमध्ये कोणत्याही प्रकारची शिथीलता देण्यात येऊ नये, मात्र भुतपुर्व नगरपालिकेतील नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका ठराव नं.७५ दिनांक २१/६/१९८५ च्या ३ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्यात यावी.

४) अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी चांगली आहे या धारणेच्या अधिन राहुन सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती देण्यात येतील यास्तव पदोन्नती दिल्यानंतर अधिकारी/कर्मचारी यांचे वर्तनाबाबत प्रतिकूल शेरा प्राप्त झाल्यास त्यानुसार सदर अधिकारी/कर्मचारी यांची पदोन्नती रदद करण्यात येईल.

५) अनुशेषाबाबत मागासवर्गीय दक्षता कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय/मा.शासनाकडुन बिंदु नामावली तपासतांना काही त्रुटी आढळुन आल्यास अगर पदोन्नतीबाबत काही वस्तुनिष्ठ आक्षेप प्राप्त झाल्यास त्याबाबत घेण्यात आलेला निर्णय पदोन्नत झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना बंधनकारक राहील.तसेच सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी त्या संवर्गात कार्यरत नियमित कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त स्वंतत्रपणे दर्शविण्यात यावी जेणेकरुन त्यासंवर्गात कार्यरत नियमित कर्मचाऱ्यांचे सेवाजेष्ठता यादीत कोणताही बदल होणार नाही.

६) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नत्या हया, पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना जेष्ठ असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या व ज्यांची प्रकरणे विचारार्थ खुली ठेवण्यात आलेली आहेत अशा अधिकाऱ्यांच्या/ /कर्मचाऱ्यांच्या जेष्ठतेस बाधा न येण्याच्या अटीच्या अधिन राहुन देण्यात येतील.

७) नाशिक महानगरपालिकेने प्रस्तावित केलेल्या सेवाप्रवेश नियमांना/त्यामध्ये होणाऱ्या बदलांना शासनाची मान्यता मिळण्याचे अधिन राहुन सदर पदोन्नती देण्यात येणार असल्याने पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना ते नियमित पदोन्नतीस पात्र आहेत असा त्याचा अर्थ होत नाही व या तदर्थ (Ad-hoc) स्वरुपातील पदोन्नतीमुळे नियमित पदोन्नतीचे कोणतेही हक्क त्यांना प्राप्त होणार नाहीत.

८) सदर तदर्थ (Ad-hoc) पदोन्नती नियमित कोटयातील रिक्त पदांवर तसेच सरळसेवा प्रविष्टांच्या कोटयातील रिक्त पदांवर देण्यात येणार असल्याने जसेजसे सरळसेवा प्रविष्ट उमेदवार उपलब्ध होतील तेव्हा तसेच भविष्यात अन्य कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास तेव्हा कोणतीही नोटीस न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यांना शेवटच्यास प्रथम (last come first go) याप्रमाणे पदावनत करण्यात येईल.

९) मागास प्रवर्गातील पदोन्नती मिळणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जात वैधताप्रमाणपत्र सादर केले नसल्यास त्यांनी ३ महिन्यांचे आंत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडील जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील अन्यथः त्यांना त्यांचे मुळ पदावर पदावनत करण्यात येईल.

१०) उपरोक्तप्रमाणे पदोन्नतीसाठी पात्र होणाऱ्या कर्मचारी/अधिका-यांपैकी ज्या अधिकारी/कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्यात आलेला असेल अशा कर्मचाऱ्यांना केवळ कार्यात्मक पदोन्नती (Functional Promotion) देय राहील.

११) ज्या पदांकरिता निम्नश्रेणीतील संवर्गातुन पदोन्नतीकरिता कर्मचारी उपलब्ध होणार नाहीत अशा पदांवर सरळसेवा भरतीव्दारे नियुक्ती करण्यात यावी असा समितीने निर्णय घेतला.

**विषय क्रमांक ०१** :- उदयान व वृक्ष प्राधिकरण निरीक्षक या संवर्गात निम्नश्रेणी हेडमाळी/माळी या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **उदयान व वृक्ष प्राधिकरण निरीक्षक.**

वेतनश्रेणी :- ९३००-३४८०० + ४३०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- ६

ब) भरलेली पदे :- ५

क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) इंग्रजी हा विषय घेवुन एस.एस.सी./मॅट्रीक पास

२) उदयान विषयक कामाचा किमान १० वर्षाचा अनुभव..

**हेडमाळी या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | १ | - | - | - | - | - | ४ | ६ |
| कार्यरत पदे | १ | १ | - | - | - | - | - | ३ | ५ |
| रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

सदर पदावर निम्नश्रेणी माळी या संवर्गातुन खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची नावे Consideration Zone मध्ये १:३ प्रमाणात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४ | श्री.देवरे महेंद्र केशव | महार अजा | एस.एस.सी पास | ७.१०.८९ | २०.५.९८ | |
| २ | ३१ | लोखंडे संजय बाबुराव | तेली इमाजा | ११ वी, | २९.४.९९ | २९.४.९९ | |
| ३ | ३३ | कदम अनिल वसंत | मराठा ससा | १२ वी पास, वन संरक्षक कोर्स | २९.४.९९ | २९.४.९९ | |

अनु.क्र. १ हे उदयान व वृक्ष प्राधिकरण निरीक्षक या पदावर पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना खुल्या गटातुन पदोन्नती देण्यात यावी अशी पदोन्नती समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०२ :-** हेड माळी या संवर्गात निम्नश्रेणी माळी या संवर्गातुन पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **हेड माळी.**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + १९०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- ९

ब) भरलेली पदे :- ४

क) रिक्त पदे :- ५

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे..**

१) सेवाजेष्ठता आणि कार्यक्षमतेप्रमाणे माळी या पदावर १० वर्ष काम केल्याचा अनुभव.

**हेडमाळी या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| मंजुर पदे | १ | १ | १ | - | - | - | - | ६ | ९ | |
| कार्यरत पदे | १ | १ | - | - | - | - | - | २ | ४ | |
| रिक्त पदे | - | - | - | - | - | - | १ | ४ | ५ | विजा/भज प्रवर्गाची संधी झालेली असल्याने फिरते आरक्षणानुसार विमाप्र प्रवर्गाकरिता रिक्त पद उपलब्ध आहे |

विजा/भज प्रवर्गाची संधी झालेली असल्याने फिरते आरक्षणानुसार विमाप्र प्रवर्गाकरिता रिक्त पद उपलब्ध होईल मात्र निम्नेश्रेणी माळी या संवर्गात विमाप्र प्रवर्गाचे कर्मचारी कार्यरत नसल्याने विजा/भज या प्रवर्गातुन पदे भरणेत यावे असा समितीने निर्णय घेतला. त्यानुसार हेडमाळी पदावर निम्नश्रेणी माळी या संवर्गातुन खालीलप्रमाणे कर्मचा-यांची नावे Consideration Zone मध्ये येत आहेत.

**प्रवर्ग :- विजा/भज** **रिक्त पदे :- १**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४५ | श्री.गिरी रमेश गुलाब | गोसावी भज-ब | ९ वी पास | १२.६.०७ | १२.६.०७ | |
| २ | ४६ | श्री.पाटील संतोष शंकर | धनगर भज-क | एस.एस.सी, एम.सी.आय.टी, कृषी पदविका,बी.एस्सी (हार्टीकल्चर) | १२.६.०७ | १२.६.०७ | |

अ.क्र.१ वर नमुद कर्मचारी श्री.गिरी रमेश गुलाब हे पदोन्नतीकरिता आवश्यक अनुभवाची १० वर्षांची अट पुर्ण करत नाही मात्र पदोन्नतीसमितीच्या शिफारशीनुसार सर्व संवर्गातील पदोन्नतीकरिता निम्नश्रेणीतील पदावर ३ वर्षे सेवेची अट ग्राहय धरण्यात यावी अशी शिफारस करण्यात आलेली असल्याने त्यानुसार श्री.गिरी हे पदोन्नतीकरिता आवश्यक किमान ३ वर्षाच्या सेवेची अट पुर्ण करत असल्याने विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्गातुन हेडमाळी या पदावर पदोन्नती देणेस समितीने शिफारस केली.

**प्रवर्ग :- खुल्या** **रिक्त पदे :- ४**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री.वेलजाळी बबन दगडु माळी | माळी इमाजा | ६ वी पास | ०४.६.८१ | २८.५.८५ | |
| २ | २ | श्री.गायकवाड निवृत्ती लक्ष्मण माळी | मराठा ससा | ६ वी पास | २०.१०.८२ | २८.५.८५ | |
| ३ | ३ | श्री.जेजुरकर रमेश नथुजी माळी | साळी इमाजा | निरक्षर | २०.१०.८२ | २८.५.८५ | |
| ४ | ४ | श्री.नागरे दिनकर माधव माळी | सोनार इमाजा | ६ वी पास | २०.१०.८२ | २८.५.८५ | |
| ५ | ५ | श्री.वझरे दत्तात्रय भा. माळी | माळी इमाजा | ७ वी पास | २०.१०.८२ | २८.५.८५ | |

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ६ | श्री.भोर भिवा नरहर माळी | मराठा स.सा | १ ली पास | २०.१०.८२ | २८.५.८५ | |
| ७ | ७ | श्री.पिंपळके एकनाथ धोंडु माळी | म.कोळी अ.ज | ९ वी पास | २०.१०.८२ | २८.५.८५ | |
| ८ | ८ | श्री.काश्मिरे दत्तु गणपत माळी | माळी इमाजा | ९ वी पास | १.८.९९७ | १.७.८५ | |
| ९ | ९ | श्री.बेंडकुळे चंदर भाऊराव माळी | म.कोळी अ.ज | ३ री पास | ९.९.८१ | १.७.८५ | |
| १० | १० | श्री.कांबळे दत्तात्रय तुकाराम माळी | महार अ.जा | नॉन मॅट्रीक | २०.१०.८२ | १.७.८५ | |
| ११ | ११ | श्री.पंचभैये नाराण शा. माळी | ब्राम्हण स.सा | ३ री पास | २०.१०.८२ | १.७.८५ | |
| १२ | १२ | श्री.देसले राजेंद्र लक्ष्मण माळी | कोकणी अ.ज | ८ वी पास | २०.१०.८२ | १.७.८५ | |

अ.क्र.१ वर नमुद श्री.वेलजाळी, अ.क्र.२ वर नमुद श्री.गायकवाड, अ.क्र.३ वर नमुद श्री.जेजुरकर व अ.क्र.४ वर नमुद श्री.नागरे हे कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक अनुभवाची १० वर्षांची अट पुर्ण करत नाही मात्र पदोन्नतीसमितीच्या शिफारशीनुसार सर्व संवर्गातील पदोन्नतीकरिता निम्नश्रेणीतील पदावर ३ वर्षे सेवेची अट ग्राहय धरण्यात यावी अशी शिफारस करण्यात आलेली असल्याने त्यानुसार सदर चारही कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक किमान ३ वर्षांच्या सेवेची अट पुर्ण करत असल्याने त्यांना खुल्या गटातुन हेडमाळी या पदावर पदोन्नती देणेस समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०३** :- जल निर्देशक (पुरुष) या संवर्गात निम्नश्रेणी सहा.जलनिर्देशक या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **जल निर्देशक (पुरुष).**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २८०० ग्रेड वेतन
अ) एकुण मंजुर पदे :- ३
ब) भरलेली पदे :- २
क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी पास
२) शासनमान्य संस्थेचा स्विमिंग इन्ट्रक्टर कोर्स उत्तीर्ण.
३) सहा.जलनिर्देशक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**जलनिर्देशक (पुरुष) या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | - | - | - | - | - | - | २ | ३ |
| कार्यरत पदे | १ | - | - | - | - | - | - | १ | २ |
| रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- १**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | श्री.देशपांडे सुनिल रंगनाथ | ब्राम्हण ससा | १० वी पास | १७.५.८४ | १७.५.८४ | |

उपरोक्तप्रमाणे जलनिर्देशक (पुरुष) या संवर्गात खुल्या गटाकरिता १ पद रिक्त असुन निम्नश्रेणी सहाय्यक जलनिर्देशक (पुरुष) या संवर्गात एकमेव कर्मचारी कार्यरत आहेत. श्री.देशपांडे यांचेकडेस पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हतेपैकी शासनमान्य संस्थेचा स्विमिंग इन्ट्रक्टर कोर्स उत्तीर्ण ही अर्हता नाही तथापि श्री.देशपांडे यांना जलनिर्देशक पदावर पदोन्नती देणेबाबत मा.औद्योगिक न्यायालयाने युएलपी नं.३५४/९९ मध्ये दिनांक १६.२.२००१ रोजी आदेश दिलेले आहेत व याविरुध्द महानगरपालिकेने केलेले अपिल याचिका क्रमांक ३५०१/२००१ मा.उच्च न्यायालयाने फेटाळले असल्याने श्री.देशपांडे यांना मा.औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जलनिर्देशक (पुरुष) या पदावर पदोन्नती देणेस समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०४ :-** सहाय्यक जल निर्देशक (महिला) या संवर्गात निम्नश्रेणी जीवरक्षक या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **सहाय्यक जल निर्देशक (महिला)**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- १

ब) भरलेली पदे :- -

क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी पास

२) शासनमान्य संस्थेचा स्विमिंग इन्ट्रक्टर कोर्स उत्तीर्ण.

३) जिव रक्षक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**जलनिर्देशक (महिला) या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | एकाकी पद असल्याने आरक्षण लागु नाही | | | | | | | १ | १ |
| कार्यरत पदे | - | - | - | - | - | - | - | - | - |
| रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

सहाय्यक जल निर्देशक (महिला) या पदावर निम्नश्रेणी जिवरक्षक या संवर्गातुन पदोन्नतीस महिला कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदर पद सरळसेवेने भरणेत यावे असा समितीने निर्णय घेतला.

**विषय क्रमांक ०५ :-** सहाय्यक जल निर्देशक (पुरुष) या संवर्गात निम्नश्रेणी जीवरक्षक या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **सहाय्यक जल निर्देशक (पुरुष)**

वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- १

ब) भरलेली पदे :- -

क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) एस.एस.सी पास

२) शासनमान्य संस्थेचा स्विमिंग इन्ट्रक्टर कोर्स उत्तीर्ण.

३) जिवरक्षक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**जलनिर्देशक (महिला) या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| अ.क्र. | | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | मंजुर पदे | एकाकी पद असल्याने आरक्षण लागु नाही | | | | | | | १ | १ |
| २ | कार्यरत पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ३ | रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | जलनिर्देशक पदावर पदोन्नती मुळे रिक्त होणारी पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ५ | एकुण रिक्त (३+४) | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- १**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | वांद्रे नारायण चिंधु | ओतारी भज-ब | ६ वी पास | २१.५.८६ | २१.५.८६ | एसएससी व पोहण्याचा कोर्स नाही |
| २. | २ | निगळ अनिल पोपट | मराठा ससा | १२ वी पास | १.५.०३ | १.५.०३ | पोहण्याचा कोर्स नाही |
| ३. | ३ | शिंदे शांत्वन झुंबर | महार अजा | बी.कॉम | १.५.०३ | १.५.०३ | पोहण्याचा कोर्स नाही |
| ४. | ४ | वाईकर राजु बाबुराव | शिंपी इमाजा | १० वी पास | १.५.०३ | १.५.०३ | पोहण्याचा कोर्स नाही |
| ५. | ५ | पवार अरुण सिताराम | न्हावी इमाजा | एसएससी, एनआयएस पटियाला पोहण्याचा कोर्स उत्तीर्ण | १.५.०३ | १.५.०३ | |

उपरोक्तप्रमाणे अ.क्र.१ ते ४ वर नमुद कर्मचारी पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हतेपैकी शासकीय पोहण्याचा कोर्स ही अर्हता धारण करत नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला. तसेच अ.क्र.५ वर नमुद श्री.अरुण सिताराम पवार हे पदोन्नतीकरिता आवश्यक अर्हता धारण करत असल्याने त्यांना सहाय्यक जलनिर्देशक (पुरुष) या पदावर खुल्या गटातुन पदोन्नती देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०६ :-** व्यवस्थापक कालिदास कला मंदीर या संवर्गात निम्नश्रेणी सहाय्यक व्यवस्थपक कालीदास कला मंदीर या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **व्यवस्थापक कालिदास कला मंदीर.**

वेतनश्रेणी :- ९३००-३४८०० + ४४०० ग्रेड वेतन

अ) एकुण मंजुर पदे :- १

ब) भरलेली पदे :- -

क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) शासनमान्य संस्थेचा डि.ई.ई पदवीका धारक..

२) सहाय्यक व्यवस्थापक पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**व्यवस्थापक कालिदास कलामंदीर या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| अ.क्र. | | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अ | ब | क | ड | | | |
| १ | मंजुर पदे | एकाकी पद असल्याने आरक्षण लागु नाही | | | | | | | १ | १ |
| २ | कार्यरत पदे | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ३ | रिक्त पदे | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

सदर पदावर निम्नश्रेणी सहाय्यक व्यवस्थापक कालीदास कला मंदीर या संवर्गातुन खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची नावे Consideration Zone मध्ये १:३ प्रमाणात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- खुला** **रिक्त पदे :- १**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | श्री.कहाणे जगन्नाथ कारभारी | तेली इमाजा | एस.एस.सी पास, आय.टी.आय रेफ्रीजरेटर ॲन्ड ए.सी मॅकेनिक कोर्स, एन.सी.टी.व्हि.टी. | ८.१.८७ | ६.१.९७ | डीईई पदविका नाही |

उपरोक्तप्रमाणे व्यवस्थापक कालिदास कला मंदीर या पदावर पदोन्नतीने नियुक्तीकरिता आवश्यक अर्हतेपैकी डीईई ही पदविका श्री.कहाणे यांचेकडेस नसल्याने त्यांना पदोन्नती देता येणार नाही असा समितीने निर्णय घेतला. व सदर संवर्गात रिक्त राहणारे पद सरळसेवेने भरणेत यावे अशी समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०७** :- नाटयगृह सुपरवायझर या संवर्गात निम्नश्रेणी नाटयगृह ऑपरेटर या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **नाटयगृह सुपरवायझर.**
वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २८०० ग्रेड वेतन
अ) एकुण मंजुर पदे :- ६
ब) भरलेली पदे :- ५
क) रिक्त पदे :- १

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) शासनमान्य संस्थेचा आय.टी.आय इलेक्ट्रिकल ट्रेड उत्तीर्ण. ..
२) नाटयगृह ऑपरेटर पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**नाटयगृह सुपरवायझर या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | १ | - | - | - | - | - | ४ | ६ |
| कार्यरत पदे | १ | - | - | - | - | - | - | ४ | ५ |
| रिक्त पदे | - | १ | - | - | - | - | - | - | १ |

नाटयगृह सुपरवायझर या पदाकरिता नाटयगृह ऑपरेटर या संवर्गातुन अनुसुचित जमातीचा उमेदवार उपलब्ध होत नसल्याने सदरचे पद सरळसेवेव्दारे भरण्यात यावे अशी समितीने शिफारस केली.

**विषय क्रमांक ०८** :- नाटयगृह ऑपरेटर या संवर्गात निम्नश्रेणी रंगमंच सहाय्यक या संवर्गातुन पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणे.

**पदोन्नतीचे पदनाम** :- **नाटयगृह ऑपरेटर.**
वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० + २४०० ग्रेड वेतन
अ) एकुण मंजुर पदे :- ६
ब) भरलेली पदे :- २
क) रिक्त पदे :- ४

**पदोन्नतीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता तसेच अनुभव खालिलप्रमाणे.**

१) शासनमान्य आय.टी.आय/ मॅकेनिक/ इलेक्ट्रिक ट्रेड उत्तीर्ण. ..
२) निकटतम निम्नश्रेणीतील पदाचा कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.

**नाटयगृह सुपरवायझर या संवर्गात पदोन्नतीकरिता अनुशेष खालिलप्रमाणे..**

| | अजा | अज | विजा/भज | | | | विमाप्र | ससा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | |
| मंजुर पदे | १ | १ | - | - | - | - | - | ४ | ६ |
| कार्यरत पदे | - | - | - | - | - | - | - | २ | २ |
| रिक्त पदे | १ | १ | - | - | - | - | - | २ | ४ |

सदर पदावर निम्नश्रेणी रंगमंच सहाय्यक या संवर्गातुन खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची नावे Consideration Zone मध्ये येणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रवर्ग :- अनुसुचित जाती** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचायाचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसुचित जाती या प्रवर्गातुन कर्मचारी पदोन्नतीकरिता उपलब्ध नाही. | | | | | | | |

नाटयगृह ऑपरेटर या संवर्गाकरिता रंगमंच सहाय्यक या प्रवर्गातुन अनुसुचित जातीमधील कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरचे पद सरळसेवेव्दारे भरण्यात यावे असा समितीने निर्णय घेतला.

**प्रवर्ग :- अनुसुचित जमाती** **रिक्त पदे :- ०१**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | श्री.कोकणी राजु शंकर | कोकणी अ.ज | एस.एस.सी पास. | १७.१०.९६ | १७.१०.९६ | आय.टी.आय/मॅकेनिक/ इलेक्ट्रिक ट्रेड उत्तीर्ण नाही |

नाटयगृह ऑपरेटर या संवर्गाकरिता रंगमंच सहाय्यक या प्रवर्गातुन अनुसुचित जमातीमधील पात्रताधारण करणारा कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरचे पद सरळसेवेव्दारे भरण्यात यावे असा समितीने निर्णय घेतला.

**प्रवर्ग :- खुला.** **रिक्त पदे :- ०२**

| अ.क्र | सेवा जेष्ठता क्रम | कर्मचा-याचे नाव | जात | शैक्षणिक पात्रता | नेमणुक दिनांक | संवर्गात आल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | श्री.दौंड वसंत बारकु | वंजारी भज .ड | ९ वी पर्यंत. | २२.०१.८७ | २२.०१.८७ | आय.टी.आय/मॅकेनिक /इलेक्ट्रिक ट्रेड उत्तीर्ण नाही |
| २ | २ | श्री.कोकणी राजु शंकर | कोकणी अ.ज | एस.एस.सी पास. | १७.१०.९६ | १७.१०.९६ | आय.टी.आय/मॅकेनिक /इलेक्ट्रिक ट्रेड उत्तीर्ण नाही |
| ३ | ३ | श्री.ठाकरे मोहन शिवराम | मराठा ससा | बी.कॉम.,इं.टंक ३० संगणक कोर्स, एल.एस.जी.डी | १८.०६.९७ | १८.०६.९७ | आय.टी.आय/मॅकेनिक /इलेक्ट्रिक ट्रेड उत्तीर्ण नाही |

नाटयगृह ऑपरेटर या संवर्गाकरिता रंगमंच सहाय्यक या प्रवर्गातुन खुल्या गटातुन पात्रताधारण करणारा कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरची पदे सरळसेवेव्दारे भरण्यात यावे असा समितीने निर्णय घेतला.

याप्रमाणे उपरोक्त विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. कार्यपत्रिकेवरील विषय संपल्याने समितीचे कामकाज संपल्याचे मा. समिती अध्यक्ष यांनी जाहीर केले

मा.आयुक्त सो. :-

उपआयुक्त (प्र.) :-

अधिक्षक अभियंता (भु.ग.यो) :-

मुख्यलेखापरीक्षक :-

क्रिडा अधिकारी तथा मागासवर्गीय अधिकारी :-

कामगार कल्याण अधिकारी :-